महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय आरोग्य अभियान
राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र

SHSRC MAHARASHTRA

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

कार्यकारी संचालक

कार्यालय दुरध्वनी क्र.२०-२६०५७५१०/०१
Email ID - shsrc.gom@gmail.com

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र,
राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, नायडू हॉस्पिटल
कपांऊड, पुणे स्टेशनच्या पाठीमागे, पुणे - ४११००१

क्र.राआयंसंकें/बाहयस्रोत शिपाई पुरवठा/ /२०२६ L४
दि. / /२०२६
१३.०४.२०२६

प्रति,

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

**विषय** - राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे कार्यालयात बाहयस्रोत एजन्सीमार्फत शिपाई या कंत्राटी पदावर १ कर्मचारी नियुक्ती करण्याकरीता जाहिरात/नोटीस प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे कार्यालयातील मंजूर शिपाई या कंत्राटी रिक्त पदासाठी बाहयस्रोत एजन्सीमार्फत १ कर्मचा-याची नेमणूक करावयाची आहे. त्याकरिता दरपत्रके आमंत्रित करीत आहोत. याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) या कार्यालयात शिपाई (१)या कंत्राटी रिक्त पदासाठी बाहयस्त्रोत यंत्रणेमार्फत करारतत्वावर कर्मचारी पुरवठा करण्यासाठी या कार्यालयाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२) सदरील संस्था मान्यताप्राप्त असणे बंधनकारक आहे.

३) नियुक्तीच्या कालावधीत आपल्या संस्थेचे काम समाधानकारक नसल्यास आपणास १५ दिवसांची नोटीस देऊन सदर कामाचा आदेश रदद करण्यात येईल.

४) नियुक्ती पत्राच्या दिनांकापासून ८ दिवसांच्या मुदतीत कर्मचारी हजर न झाल्यास नेमणूकीसाठी आपण इच्छूक नसल्याचे गृहीत धरण्यात येईल व त्यानुसार पुढिल कार्यवाही करण्यात येईल.

५) नियुक्त कर्मचारी कार्यालयात कार्यालयीन वेळेनुसार पुर्ण दिवस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

६) कार्यालयीन वेळेत काम करीता असतांना कर्मचा-यास काही दुखापत/अपघात झाल्यास याची जबाबदारी संस्थेची असेल.

७) ठरलेल्या मुदतीआधी शासनाच्या आदेशानुसार प्रकल्प बंद झाल्यास आपल्या संस्थेबरोबरचा करार अपोआप संपुष्टात येईल.

८) संस्थेच्या दरपत्रकातील नमूद दर हे सर्व करांसहित तसेच दरांमध्ये खाडाखोड अथवा अंक गिरविलेले नसावेत. विहित मुदतीमध्ये प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्यात येतील, अन्यथा नाकारण्यात येतील. दरपत्रके सिलबंद स्वरुपात थेट या कार्यालयाकडे पाठविण्यात यावीत. दरपत्रकमध्ये जी.एस.टी./सी.एस.टी, वॅट तसेच पॅन/टीन नंबर इ. माहिती नमूद करणे बंधनकारक राहील.

९) कराराची मुदत वाढविणे किंवा कमी करणे याबाबतचा अंतीम निर्णय मा. कार्यकारी संचालक, यांचा राहील. त्यांनी सर्व अधिकार राखून ठेवले आहेत.

१०) तसेच दरपत्रकांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यास, अथवा त्यामध्ये काही त्रूटी आढळून आल्यास ही दरपत्रके (नोटीस) प्रक्रिया स्विकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे इ. अंतिम अधिकार मा. कार्यकारी संचालक यांना राहतील.

उपरोक्त प्रस्तावित केलेनुसार बाहयस्त्रोत एजन्सीमार्फत शिपाई या कंत्राटी पदावर १ कर्मचारी नियुक्ती करण्याकरीता इच्छूक असल्यास उपरोक्त नमुद अटी व शर्तीप्रमाणे आपले दरपत्रक या कार्यालयास ही नोटीस (सूचना) संकेतस्थळावर प्रसिध्द होताच ७ चे दिवसात (दिनांक 28/08/२०२६ पर्यंत) समक्ष अथवा पोस्टाने पाठवावेत.

(डॉ. रामजी आडकेकर)
**कार्यकारी संचालक**
**राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र**
**(SHSRC)पुणे**